| MHRG120000292020 | दावा दाखल दिनांक | : | २७-०१-२०२० |
|---|---|---|---|
| | दावा नोंदणी दिनांक | : | २७-०१-२०२० |
| | निकाल दिनांक | : | ०९-०३-२०२६ |
| | कालावधी **: ०६ वर्ष, ०१ महिने, १० दिवस** | | |

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मुरुड, जि. रायगड-अलिबाग.**
**(पीठासीन अधिकारी - घनःशाम रा. तिवारी)**

**नियमीत दिवाणी दावा क्र.४/२०२०.** **निशाणी क्र.४४**

| | |
|---|---|
| दत्तात्रय गणपतराव गायकवाड,<br>वय ६५ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,<br>रा. ए-३, गणेश को.ऑप.हौस. सोसायटी,<br>मुरूड, ता. मुरुड, जि. रायगड. | **... वादी** |
| विरूध्द | |
| नारायण शंकर लिमकर,<br>वय ४२ वर्षे, धंदा -शेती,<br>राहणार- आंद्रुड, पो. लांजेश्वर, ता. भूम<br>जि.उस्मानाबाद | **... प्रतिवादी** |
| वादी तर्फे श्री. एम.जे.तांबडकर, विधीज्ञ.<br>प्रतिवादीतर्फे श्री आशिष देशपांडे, विधीज्ञ | |

**न्या य नि र्ण य**
(दिनांक ०९-०३-२०२६ रोजी अधिघोषीत)

प्रस्तूतचा दावा वादीने प्रतिवादीकडून रू.४,००,०००/- अधिक सदर रक्कम घेतल्यापासून ते परतफेड करेपर्यंत १५ टक्के वार्षीक व्याज वसुलीसाठी दाखल केला आहे.

**०२.** वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. प्रतिवादीला आर्थिक अडचण निर्माण झाल्यामुळे प्रतिवादीने वादीकडे आर्थिक मदतीची उसनवार रक्कमेची मागणी केली. त्यामुळे वादीने दिनांक १२.०१.२०११ रोजी एन.इ.एफ.टी.द्वारा प्रतिवादीच्या खात्यांत रक्कम रु. २,००,०००/– (रुपये दोन लाख मात्र) जमा केले. त्यानंतर वेळोवेळी प्रतिवादीच्या गरजेनुसार रोख स्वरुपात दिलेल्या एकूण रक्कमांची बेरीज रक्कम

रु.२,००,०००/– (रुपये दोन लाख मात्र) अशी एकूण रक्कम रु.४,००,०००/– (रुपये चार लाख मात्र) प्रतिवादीला पोच झालेली आहे. प्रतिवादीने सदर रक्कम रु. ४,००,०००/– परतफेडीसाठी दिनांक २५.०८.२०१९ रोजी रु. ४,००,०००/– चा इंडीयन ओव्हरसिज बैंक शाखा अंधेरी या बँकेचा धनादेश क्र. ९५९३४२ वादीला दिला. सदरचा धनादेश वादीने त्याच्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखा मुरुड–जंजिरा या बँकेतील खात्यात जमा केला असता सदरहू बँकेने "नॉन सि.टी.एस.चेक" कारण देऊन वादीला दिनांक ०९.१०.२०१९ रोजी मेमोसह धनादेश परत केला. त्याबाबत वादीने त्याचे वकीलामार्फत दिनांक ११.१०.२०१९ रोजी प्रतिवादीस नोंदणीकृत डाकेने नोटीस पाठविली. सदर नोटीस प्रतिवादीस दिनांक २६.१०.२०११ रोजी प्राप्त झाली. सदर नोटीसला प्रतिवादीने त्याचे वकीलामार्फत दिनांक ०२.११.२०१९ रोजी उत्तर दिले. नोटीसच्या उत्तरामध्ये प्रतिवादीने वादीकडून रक्कम घेतल्याचे कबुल केलेले असून वादीला धनादेश दिल्याचे देखील कबुल केलेले आहे. मात्र प्रतिवादीने वादीचा पुर्ण व्यवहार मिटविलेला आहे असे उत्तरामध्ये नमुद केले आहे. शेवटी प्रतिवादीकडून येणे असलेली रक्कम रु.४,००,०००/- व रक्कम घेतल्यापासून ते वादीला प्रत्यक्ष रक्कम मिळेपर्यंत द.सा.द.शे. १५ दराने व्याज देण्याचा हूकूम व्हावा अशी वादीने मागणी केली आहे.

०३. प्रतिवादीने निशाणी २१ कडे कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादीने नातेसंबंधाचा मजकूर मान्य करून इतर संपूर्ण मजकूर नाकारला आहे. प्रतिवादीला आर्थिक अडचण निर्माण झाल्यामूळे वादीने प्रतिवादीला दिनांक १२.०१.२०११ रोजी एन.इ.एफ टी. व्दारा प्रतिवादीच्या खात्यात रक्कम रू.२,००,०००/–जमा केल्याचे व त्यानंतर वेळोवेळी रु.२,००,०००/– अशी एकूण रक्कम रू.४,००,०००/– प्रतिवादीला दिल्याचे प्रतिवादीने नाकारले आहे. प्रतिवादीने रू. ४,००,०००/– च्या परतफेडीकरिता दिनांक २५.०८.२०१९ रोजी वादीला रू.४,००,०००/– रक्कमेचा इंडियन ओव्हरसिज बैंक शाखा अंधेरी बँकेचा धनादेश क्र. ९५९३४२ दिल्याचा व धनादेश अनादरीत झाल्याचा मजकूर नाकारला आहे.

०४. प्रतिवादीचे कथनानूसार प्रतिवादी हे वादीच्या पत्नीचे सख्खे चुलत भाऊ आहेत. वादी शिक्षक म्हणून कार्यरत असल्यामुळे वादीस चांगला पगार होता, वादी व वादीची पत्नी नातेवाईकांना व इतर लोकांना व्याजाने पैसे देण्याचा सावकारी व्यवसाय करतात. वादीस प्रतिवादीची आर्थिक अडचण माहिती झाल्यामुळे वादीने प्रतिवादीस व्याजाने पैसे घेण्याची विचारणा केली. वादीने प्रतिवादीकडुन इंडियन ओव्हरसिज बँक शाखा अंधेरी या बँकेचा धनादेश क्र. ९५९३४२ आणि याच बँकेचा आणखी एक धनादेश असे दोन कोरे धनादेश साक्षीदारासमक्ष घेऊन दिनांक १२.०१.२०११ रोजी रक्कम रू. २,००,०००/– व्याजाने प्रतिवादीस एन.इ.एफ.टी. व्दारा दिले होते. वादीकडून वर

नमुद रक्कम प्रतिवादीस मिळाल्या नंतर प्रतिवादीने वेळोवेळी रोख स्वरूपात आणि वादीच्या मुरूड जंजिरा येथील बँक खात्यावर व्याजाची रक्कम जमा केली. वादीला व्याजाची रक्कम मिळत असल्यामुळे प्रतिवादीबरोबर व्यवहार व्यवस्थित चालू होता.

**०५.** प्रतिवादीचे पुढे कथन आहे की, त्याने त्याचे विनायका कॉम्पलेक्स चिंद्रण रोड पालेखुर्द एम. आय. डी. सी. जवळ तलोजा ता. पनवेल येथील घर विक्री केल्यानंतर वादीची मुद्दल रक्कम आणि व्याजाची रक्कम रोख स्वरूपात मौजे आंद्रुड ता. भूम येथे वादीच्या पत्नीच्या माहेरी दिनांक ०४.१०.२०१९ रोजी विठ्ठल बापूराव नलावडे आणि जानू पर्वत चव्हाण या साक्षीदारांसमक्ष वादीला दिलेली आहे. व्यवहार पूर्ण झाला म्हणून प्रतिवादीने वादीकडून वर नमुद धनादेशांची मागणी केली असता वादीने सदर धनादेश खूप दिवसापूर्वी घेतलेले असल्यामुळे हरवले आहेत सापडत नाहीत, जर घरात धनादेश मिळून आले तर परत देऊन टाकू असे सांगीतले. प्रतिवादीने वादीवर व बहिणीवर पूर्ण विश्वास ठेवला. प्रतिवादीचे कथन आहे की, त्याचे व वादीच्या पत्नीचे भाऊ यांचे भावकी संबंधातून काही किरकिरी झाल्यामुळे प्रतिवादीस जाणून बुजून त्रास देण्याच्या उद्देशाने कोऱ्या धनादेशचा गैरफायदा घेऊन वादीने खोटा दावा दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादीस झालेल्या मानसिक, अर्थिक व शारीरिक त्रासापोटी वादीने प्रतिवादीस रू.५०,०००/- नुकसानभरपाई दयावी व वादीचा दावा खर्चासह फेटाळावा अशी मागणी केली आहे.

**०६.** वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनांवरून माझ्या सन्माननीय पुर्वाधिकारी यांनी निशाणी क्र.२९ कडे खालील प्रमाणे वाद मुद्दे निश्चित केलेले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| 1. | Whether plaintiff proves that he has given hand loan of Rs.4,00,000/- to defendant ? | Partly Yes. |
| १. | वादीने प्रतिवादीला रु.४,००,०००/- हात उसने दिल्याचे वादीने सिध्द करत आहे काय? | अशंत: होय |
| 2. | Whether the defendant has repaid the amount of Rs.4,00,000/-? | No. |
| २. | प्रतिवादीने रु.४,००,०००/- ची परतफेड केली आहे काय? | नाही. |
| 3. | Whether plaintiff is entitled for relief of recovery amount as sought ? | Partly Yes. |
| ३. | वादी मागणी केल्याप्रमाणे रक्कम वसूल करुन मिळण्यास आहे काय ? | अशंत: होय |

4. What order and decree? As per final order
४. आदेश व हुकूमनामा काय? **अंतिम आदेशाप्रमाणे**

## का र ण मि मां सा

**०७.** प्रस्तूत दाव्यात वादीने साक्षीदार क्र. १ म्हणून स्वतःची निशाणी क्र. ८ कडे सरतपासणीचे शपथपत्र दाखल केले असून दाव्याचे पुष्ठयर्थ खालील कागदपत्र दाखल केली आहेत.

| **अ.क्र.** | **दस्ताचे स्वरूप** | **निशाणी** |
|---|---|---|
| १. | मुळ धनादेश दिनांक २५.०८.२०१९ | ०९ |
| २. | धनादेश परतीचा बँक मेमो | १० |
| ३. | प्रतिवादीला पाठविलेल्या नोटीसची स्थळ प्रत | ११ |
| ४. | प्रतिवादीला नोटीस मिळाल्याची पोहच पावती | १२ |
| ५. | प्रतिवादीने वादीच्या नोटीस दिलेल्या उत्तराची प्रत | १३ |

**०८.** प्रतिवादीला पुरेशी संधी देवूनही त्याने कोणताही पुरावा सादर न केल्याने निशाणी १ कडील दिनांक ०८.०५.२०२५ चे आदेशानूसार त्यांचेविरुध्द पुरावा बंद आदेश पारीत करण्यात आले.

**०९.** वादी तर्फे विद्वान वकील श्री.एम.जे.तांबडकर यांनी वादीच्या दाव्यातील कथने व सादर केलेली कागदपत्रांना अनुसरुन युक्तीवाद केला. प्रतिवादीचे विद्वान वकील श्री आशिष देशपांडे यांनी प्रतिवादीच्या कैफियत मधील कथने तसेच वादीच्या उलटतपास आधारे युक्तीवाद केला.

**<u>मुद्दे क्र.१ व २ करीता</u>** :-

**१०.** मुद्या क्र.१ व २ एकमेकांशी निगडीत असल्याने संक्षिप्ततेसाठी दोन्ही मुद्यांवरील पुराव्याची एकत्रीत चर्चा केलेली आहे.

**११.** वादीने निशाणी क्र.८ कडील साक्षीच्या प्रतिज्ञालेखात वाद पत्रातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे त्यामुळे तो मजकूर इथे लिहीण्याचे टाळले आहे. उलटतपासात वादीने कथन केले की, दाव्यात व पुराव्याच्या शपथपत्रात कथीतपणे दोन लाख रुपये प्रतिवादीला कोणत्या बँक

खात्यातून कोणत्या बँक खात्यात एन.ई.एफ.टी द्वारे वर्ग केले, प्रतिवादीला कथीत रोख रक्कम दोन लाख रुपये वेळोवेळी कोणत्या तारखांना दिले नमूद नाही. वादीने मान्य केले की, आरोपीला एन.ई.एफ.टी द्वारे ज्या खात्यातून दोन लाख रुपये पाठवले होते ते खाते सध्या अस्तित्वात नाही, त्याने प्रतिवादीविरुध्द परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ अथवा भादंवि कलम ४२० नुसार फिर्याद दाखल केली नाही. प्रतिवादीच्या वकीलांनी विचारलेल्या इतर सूचक प्रश्नांना वादीने नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

**१२.** अभिलेखावारील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने दाव्यात व त्याचे पुराव्याचे शपथपत्रात प्रतिवादीला रू. २,००,०००/– एन.इ.एफ.टी. व्दारा व त्यानंतर वेळोवेळी प्रतिवादीच्या गरजेनुसार रोख स्वरुपात रु.२,००,०००/– अशी एकूण रक्कम रु.४,००,०००/– दिल्याचे कथन केले असून प्रतिवादीने सदर रक्कम परतफेडीसाठी रु.४,००,०००/– चा धनादेश दिल्याचे वादीचे म्हणणे आहे. वादीने प्रतिवादीस कथीत रोख रक्कम रु.२,००,०००/– वेळोवेळी कोणत्या तारखांना दिली याबाबत दाव्यात व पुराव्याचे शपथपत्रात काहीएक नमूद केलेले नाही व त्यासंबंधी काहीएक पुरावा दाखल केलेला नाही.

**१३.** यासंबंधी प्रतिवादीने त्याचे कैफियत निशाणी २१ मध्ये व वादीचे नोटीसला दिलेल्या निशाणी १३ कडील उत्तरात त्याने वादीला इंडियन ओव्हरसिज बँक शाखा अंधेरी या बँकेचा धनादेश क्र. ९५९३४२ आणि याच बँकेचा आणखी एक धनादेश असे दोन कोरे धनादेश साक्षीदारासमक्ष दिल्याचे व वादीने दिनांक १२.०१.२०११ रोजी रक्कम रू. २,००,०००/– प्रतिवादीस एन.इ.एफ.टी. व्दारा दिले होते असे कथन केले आहे. प्रतिवादीने वादीला धनादेश क्र.९५९३४२ शिवाय आणखी एक धनादेश दिल्याचे कथन केले असले तरी त्या दुस–या धनादेशाचा क्रमांक अथवा इतर तपशिल नमूद केलेला नाही अथवा त्याबाबत काहीएक तोंडी किंवा लेखी पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीने आणखी एक धनादेश दिल्याची बाब मान्य करता येणारी नाही.

**१४.** वादीने प्रतिवादीला रु.४,००,०००/– हात उसने दिल्याचे कथन केले असले तरी रोखीने दिलेल्या रु.२,००,०००/– रकमेबाबत कोणताही तारीखवार तपशिल सादर केला नाही व त्याबाबत पुरावा दिला नाही. मात्र प्रतिवादीने त्याचे कैफियत व वादीचे नोटीसला दिलेल्या उत्तरात वादीने एन.एफ.टी.व्दारे रु.२,००,०००/– दिल्याचे व त्याने वादीला धनादेश क्र.९५९३४२ दिल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादीला रु.२,००,०००/– हातउसने दिल्याचे व त्याचे परतफेडीसाठी धनादेश दिल्याची बाब सिध्द झाली आहे. करीता मी मुद्दा

क्र.१ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदविला आहे.

**१५.** प्रतिवादीने त्याचे कैफियत व वादीचे नोटीसला दिलेल्यानिशाणी १३ कडील उत्तरात वादीकडून वर नमुद रक्कम मिळाल्या नंतर प्रतिवादीने वेळोवेळी रोख स्वरूपात आणि वादीच्या मुरूड जंजिरा येथील बँक खात्यावर व्याजाची रक्कम जमा केली तसेच त्याने विनायका कॉम्पलेक्स चिंद्रण रोड पालेखुर्द एम. आय. डी. सी. जवळ तलोजा ता. पनवेल येथील घर विक्री केल्यानंतर वादीची मुद्दल रक्कम आणि व्याजाची रक्कम रोख स्वरूपात मौजे आंद्रुड ता. भूम येथे वादीच्या पत्नीच्या माहेरी दिनांक ०४.१०.२०१९ रोजी विठ्ठल बापूराव नलावडे आणि जानू पर्वत चव्हाण या साक्षीदारांसमक्ष वादीला दिल्याचे कथन केले आहे. मात्र प्रतिवादीने त्यासंबंधी कोणताही तोंडी अथवा लेखी पुरावा सादर केलेला नाही. प्रतिवादीने त्याचे कथनाचे पुष्ठयर्थ स्वतःची साक्षदेखील नोंदविलेली नाही. वादीकडून घेतलेली रक्कमेपैकी कोणतीही रक्कम परत केल्याची बाब प्रतिवादीने सिध्द केलेली नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करीता</u>** :-

**१६.** मुद्या क्र.१ च्या निष्कर्षान्वये वादीने प्रतिवादीला रु.२,००,०००/– दिल्याचे सिध्द झाले असून प्रतिवादीने वादीला सदर रक्कम परतफेड केल्याची बाब सिध्द झालेली नाही. त्यामुळे वादी प्रतिवादीकडून रु.२,००,०००/– मिळण्यास पात्र आहे. वादीने रक्कम दिल्यापासून ते रक्कम परत मिळपर्यंत द.सा.द.शे.१५ टक्के वाज मिळण्याची मागणी केली आहे. परंतु वादी व प्रतिवादी यांनी मान्य केल्यानूसार ते एकमेकांची नातेवाईक आहेत. वादीने प्रतिवादीला आर्थीक मदत म्हणून उसनवार रु.२,००,०००/– दिल्याचे वादीचे कथन आहे. वादी व प्रतिवादीमधील व्यवहार हा व्यापारीक स्वरुपाचा नाही. याशिवाय वादीने प्रतिवादीला उसनवार रक्कम देतांना त्यावर कोणत्याही स्वरुपाचे व्याज देण्याची ठरले होते असे वादीचे कथन नाही अथवा तसा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे वादीने मागणी केल्याप्रमाणे व्याजाची मागणी मान्य करता येणार नाही.

**१७.** वादीने प्रतिवादीला दिलेल्या रकमेचा कालावधी, आपसातील नातेसंबधातून झालेला व्यवहार तसेच दाव्याच्या सुनावणीत गेलेला कालावधी हे सर्व पाहता दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३४ नूसार दावा दाखल केल्याच्या तारखेपासून रक्कम रु.२,००,०००/– परतफेड होईपर्यंत प्रतिवादीने वादीला द.सा.द.शे.६ टक्के व्याज देण्याचे आदेश करणे योग्य होईल. करीता मी मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदविला आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>:**

**१८.** मुद्दे क्र. १ ते ३ च्या निष्कर्षान्वये वादीचा दावा अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे. प्रतिवादीने वादीची रक्कम परत करण्याचे त्याचे कर्तव्य आणि दायित्व पूर्ण केले नसल्याने, त्याने वादीला दावा दाखल करण्यास भाग पाडले आहे. म्हणून, प्रतिवादी हा वादीला दाव्याचा खर्च देण्यास देखील जबाबदार आहे. करीता मी मुद्दा क्र.४ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करतो.

**<u>आ दे श</u>**

| | |
|---|---|
| ०१. | वादीचा दावा खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| ०२. | दावा सुरू झाल्यापासून ते प्रत्यक्षात वसूल होईपर्यंत, प्रतिवादीने वादीला दरवर्षी ६% व्याजदराने रु. २,००,०००/- (रू.दोन लाख मात्र) ची रक्कम द्यावी. |
| ०३. | प्रतिवादीने दाव्याचा खर्च वादीला दयावा व स्वतःचा खर्च सहन करावा. |
| ०४. | येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा. |
| | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. |

GHANSHAM RAMLAL TIWARI
Digitally signed by GHANSHAM RAMLAL TIWARI
Date: 2026.03.11 14:48:53 +0530

दिनांक : ०९-०३-२०२६

(घनःशाम रा. तिवारी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मुरुड, जि. रायगड-अलिबाग.